क्र.जिनिस/कार्या-37/आस्थाविका/का-2/ 1167 /2021
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
दिनांक : 16 /09/ 2021

**सभेची नोटीस**

विषय :- आमदारांचा स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम
सामाजिक सभागृहाची देखभाल दुरस्ती सामाजिक संस्थांकडे देण्याबाबत.

संदर्भ : 1. नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्र.स्थाविका-0118/प्र.क्र.5/का1482 दिनांक 19 मार्च 2018.

2. अधिक्षक अभियंता, ना.सु.प्र. यांचे पत्र क्रमांक /संपत्ती विभाग/711 ,दि.06/07/2021

3. वेबसाईटवरील प्रकाशित जाहिरात दि.08/07/2021

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने आमदारांचा स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत आपले यंत्रणेमार्फत सामाजिक सभागृह/समाजभवनांचे विविध ठिकाणी बांधकाम झालेले आहे. सदरील सामाजिक सभागृह/समाजभवन या वास्तुंची मालकी शासनाकडेच ठेवुन देखभाल दुरूस्तीची जबाबदारी नोंदणीकृत सामाजिक/विश्वस्त संस्थाकडे सोपविण्याबाबत संदर्भ क्र.1 चे शासन परिपत्रकात कार्यपध्दती नमुद केलेली आहे.

याबाबत नागपूर सुधार प्रन्यास यांनी वास्तुंची देखभाल व दुरस्ती नोंदणीकृत सामाजिक संस्थांकडे सोपविण्यास इच्छुक असल्यास अशा एकुण 107 वास्तुंची यादी संदर्भ पत्र क्र.2 अन्वये या कार्यालयास सादर केलेली आहे.

याबाबत संदर्भ क्र.3 अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाचे वेबसाईटवर दि.08/07/2021 रोजी जाहिरात प्रकाशीत करण्यात आलेली होती.त्याअनुषंगाने 15 नोंदणीकृत संस्थांनी सदरील सामाजिक सभागृह/समाजभवनांकरीता प्रस्ताव सादर केलेला आहे. दि.27/08/2021 रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेत झालेल्या सभेत प्राप्त झालेले प्रस्तावांची संख्या अतिशय कमी असल्यामुळे सर्व सामाजिक संस्थांना जाहिरातीतील अर्ज सादर करताना सादर करावयाच्या कागदपत्रांची माहिती देण्यासाठी पुढील जाहिरातीपूर्वी प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्याकरीता व सर्व इच्छुक संस्थांना सामाजिक सभागृह/समाजभवन वाटप करण्याच्या कार्यपध्दती व आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्याबाबत **सभा दि. 22/09/2021 रोजी दुपारी 01:00 वाजता बचत भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर** येथे आयोजित करण्यात येत आहे. तरी इच्छुक सर्व ना नफा ना तोटा तत्वावरील सामाजिक संस्थांनी याची नोंद घ्यावी,हि विनंती.

14/9

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती , नागपूर

प्रत : 1.विशेष कार्य अधिकारी मार्फत मा.ना.डॉ.नितीन राउत, उर्जामंत्री तथा पालकमंत्री नागपूर ,यांचे कार्यालय नागपूर यांना माहीतीस्तव सादर.

2.स्विय सहायक,मा.पालकमंत्री महोदयांचे कार्यालय नागपूर